# ‘सिटीझन सेंट’ उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट

# तर, मराठीमध्ये ‘स्थळ’ची बाजी

*‘पिफ’च्या चित्रपट पारितोषिकांची घोषणा*

पुणे, दि. २५ जानेवारी २०२४ : २२ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) जागतिक चित्रपट स्पर्धेमध्ये ‘सिटीझन सेंट’ या टिनाटीन कजरिशविली यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटाला उत्कृष्ठ चित्रपटाचे महाराष्ट्र शासनाचे ‘प्रभात’ उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचे पारितोषिक मिळाले. तर संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटाचे पारितोषिक जयंत सोमळकर यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘स्थळ’ या चित्रपटाला मिळाले.

महाराष्ट्र शासन आणि पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्‌यमाने आयोजित करण्यात आलेल्या २२ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात समारोप समारंभात आज संध्याकाळी विविध पारितोषिकांची घोषणा करण्यात आली. यावेळी महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल, ‘नॉर्थ अमेरिका मराठी असोसिएशन’ (नाफा)चे अध्यक्ष अभिजीत घोलप, पुणे फिल्म फाऊंडेशनचे सरचिटणीस रवी गुप्ता, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, विश्वस्त सतिश आळेकर, डॉ. मोहन आगाशे, एमआयटी - एडीटी विद्‌यापीठाचे प्र कुलगुरू मोहीत दुबे, आंतरराष्ट्रीय ज्यूरी, चित्रपट निवड समितीचे सदस्य उपस्थित होते.

जॉर्जिया या देशातील चित्रपट ‘सिटीझन सेंट’ला महाराष्ट्र शासनाचे १० लाख रुपयांचे ‘प्रभात’ उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचे पारितोषिक मिळाले आहे. दिग्दर्शक कजरिशविली आणि निर्माते लाशा खलवशी यांना प्रत्येकी ५ लाख रुपये विभागून मिळणार आहेत.

मराठी आंतरराष्ट्रीय चित्रपट स्पर्धेत 'स्थळ' या सोमळकर यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटाला महाराष्ट्र शासनाचे संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटाचे ५ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले.

मारीया प्रोचाझस्का या पोलिश चित्रपट निर्मातीने दिलेल्या निधीतून दिले जाणारे खास पारितोषिक एफटीआयची विद्यार्थिनी आयेशा जैन हीला देण्यात आले.

पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या सहकार्याने अमेरिकेतील कॅलिफोर्निया सॅन होजे येथील कॅलिफोर्निया चित्रपट गृहात २७ आणि २८ जुलै २०२४ या दोन दिवशी अमेरिकेतील पहिला मराठी चित्रपट महोत्सव 'नाफा' आजोजित करण्यात येणार असल्याची घोषणा 'नॉर्थ अमेरिका फिल्म असोसिशन'चे अध्यक्ष अभिजीत घोलप आणि 'पिफ'चे संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी केली.

पुरस्कारप्राप्त चित्रपट

आंतरराष्ट्रीय चित्रपट स्पर्धा

- 'सिटीझन सेंट' - महाराष्ट्र शासनाचे 'प्रभात' उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट पारितोषिक - १० लाख रुपये. (दिग्दर्शक - टिनाटीन कजरिशविली)
- अॅनाईज टेलेनी - (चित्रपट- द ड्रीमर) महाराष्ट्र शासनाचे 'प्रभात' उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट दिग्दर्शक पारितोषिक - ५ लाख रुपये
- 'एमआयटी-एसएफटी ह्युमन स्पिरीट पारितोषिक' - १००० अमेरिकन डॉलर - अमर गमाल (चित्रपट - द बर्डंड)
- स्पेशल मेंशन प्रमाणपत्र - अभिनेत्री एली स्कोरचेव्हा (बल्गेरिया) चित्रपट - ब्लागाज लेसन

आंतराष्ट्रीय मराठी चित्रपट स्पर्धा

- महाराष्ट्र शासनाचे संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटाचे पारितोषिक - 'स्थळ' - (दिग्दर्शक - जयंत सोमळकर) - ५ लाख रुपये.
- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ उत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शक पारितोषिक - श्रीकांत प्रभाकर - चित्रपट - 'भेरा' - २५,००० रुपये.
- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ उत्कृष्ट अभिनेता पारितोषिक - देवा गाडेकर - चित्रपट - 'वल्ली' - २५,००० रुपये.
- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ उत्कृष्ट अभिनेत्री पारितोषिक - स्वाती गोटावळे - चित्रपट - 'छबिला' - २५,००० रुपये.

- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ उत्कृष्ट चित्रपट संहिता पारितोषिक - जयंत सोमळकर- चित्रपट - ‘स्थळ’ - २५,००० रुपये.

- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ उत्कृष्ट छायाचित्रकार पारितोषिक - विजय मिश्रा - चित्रपट - श्यामची आई - २५,००० रुपये

- ज्यूरी मेंशन प्रमाणपत्र - कबीर (अभिनेता) - चित्रपट - ‘जिप्सी’

- ज्यूरी मेंशन प्रमाणपत्र - श्रीकांत प्रभाकर (कला दिग्दर्शक) चित्रपट - ‘भेरा’

विद्यार्थी चित्रपट स्पर्धा

- बेस्ट लाईव्ह अ‍ॅक्शन अ‍ॅवार्ड - चित्रपट - डान्सिंग क्लाऊड (पोलंड) - मिचल मायझेस्की - १००० अमेरिकन डॉलर

- उत्कृष्ठ दिग्दर्शक बेस्ट लाईव्ह अ‍ॅक्शन अ‍ॅवार्ड - मार्टीन कुबा (झेक रिपब्लिक) - चित्रपट - विनलँड

- ज्यूरी मेंशन प्रमाणपत्र - आय जू लीन - दिग्दर्शक - चित्रपट - सेपरेशन सीझन (झेक रिपब्लिक)

- ज्यूरी मेंशन प्रमाणपत्र - आर्चीत एस. किरकिंडे - पटकथा लेखक - चित्रपट - असमतोल (भारत)